# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई

## विषय:- इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे नियम सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत तज्ञ समिती बैठक दिनांक ०९/०६/२०१४ कल्याणकारी मंडळ,मुंबई

दिनांक ०९/०६/२०१४ रोजी सायंकाळी ४.०० वा.मा.मंत्री (कामगार) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गतच्या तज्ञ समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.श्री.हसन मुश्रीफ | मा.मंत्री (कामगार) तथा अध्यक्ष, तज्ञ समिती |
| २. | मा.श्री.राजेंद्र गावीत | मा.राज्यमंत्री (कामगार) तथा उपाध्यक्ष, तज्ञ समिती |
| ३ | मा.श्री.अरविंदकुमार (भा.प्र.से.) | मा.प्रधान सचिव (कामगार) महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ४ | श्री.एच.के.जावळे (भा.प्र.से.) | मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती. |
| ५ | श्री.बाळासाहेब कोळसे पाटील | मा.सह सचिव (कामगार) |
| ६ | श्री.पी.डी.ममदापुरे | मुख्य अभियंता तथा सह सचिव,सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई तथा सदस्य, तज्ञ समिती |
| ७ | श्री.भु.मू.गुरव | मा. उप सचिव,विधी व न्याय विभाग, मुंबई तथा सदस्य तज्ञ समिती |
| ८ | श्री.विलास मोरे | मा.संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय तथा सदस्य तज्ञ समिती |
| ९ | श्री.आसिफ उ.कासकर | मा. सदस्य तज्ञ समिती |
| १० | श्री.मुस्ताक अ.दळवी | मा. सदस्य तज्ञ समिती |
| ११ | श्री.विवेक अब्रोल | मा. सदस्य तज्ञ समिती |
| १२ | श्री.भरमा कांबळे | मा. सदस्य तज्ञ समिती |
| १३ | श्रीमती निलांबरी भोसले | सचिव, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई तथा सदस्य-सचिव, तज्ञ समिती |

मा.अध्यक्ष महोदय यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली. बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**मुददा क्र. :- १) दिनांक ०८/१०/२०१३ रोजी झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे**

मा.अध्यक्ष महोदयांनी मागील बैठकीच्या इतिवृत्तांबाबत काही सुधारणा असल्यास सांगण्याबाबत नमुद केले. उपस्थित सदस्यांनी सुधारणा नसल्यामुळे इतिवृत्तांस मंजूरी देण्यात यावी असे प्रतिपादन केले. त्यानुसार सर्वानुमते इतिवृत्तांस मंजूरी देण्यात आली.

**मुददा क्र.:- (२) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदित बांधकाम कामगारांस ५ गृहपयोगी वस्तु खरेदी करण्यास अर्थसहाय रु.३०००/- देण्यात येत असल्याबाबत.**

कामगार आयुक्त यांनी मंडळाच्या नोंदणीकृत बांधकाम कामगारांना दयावयाच्या ५ गृहपयोगी वस्तु ऐवजी रोख रक्कम रु.३०००/- देण्याबाबत शासन निर्णय २६ मे. २०१४ बाबत माहिती सांगीतली. सदर शासन निर्णयाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांस देऊन या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. मा.मंत्री महोदयांनी सांगीतले की, नोंदणीकृत बांधकाम कामगारांना भेटवस्तु खरेदी करुन देण्याऐवजी कामगारास त्यांच्या पसंतीच्या वस्तु खरेदी करता याव्यात या दृष्टीकोनातुन प्रत्येक कामगारास रु.३०००/- रक्कम थेट लाभार्थ्याच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येणार आहे असे सांगीतले. या शासन निर्णयाचे सर्वानी स्वागत केले व यामुळे कामगारांच्या नोंदणीस चालना मिळेल असा विश्वास व्यक्त केला.

**मुददा क्र.:- (३) महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम, २००७ मधील नियम क्र.३३ मध्ये नाका कामगारांसाठी प्रस्तावित दुरुस्तीबाबत**

मा.कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी असे सांगीतले की, महाराष्ट्र राज्यामध्ये मोठयाप्रमाणात प्रत्येक शहरात स्थानिक पातळीवर बांधकाम कामगार काम करतात. त्यांना स्थानिक पातळीवर नाका कामगार म्हणुन संबोधण्यात येते. या बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अडचणी निर्माण होत आहेत. कामगार संघटनेकडून ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार मिळण्याबाबत निवेदने प्राप्त होत आहेत. तसेच या पुर्वी मंडळाने कामगार संघटनांना अधिकार देण्याबाबत निर्णय घेतला होता. तथापि, त्यास विधी व न्याय विभागाची मंजूरी प्राप्त होऊ शकलेली नाही. मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन

गुजरात राज्यामध्ये ग्राम पंचायत, नगरपालिका, महानगर पालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थानी दिलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे अशा कामगारांची नोंदणी करण्यात येत आहे. याच धर्तीवर या कामगारांच्या बाबतीत संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था उदा.ग्राम पंचायतचे ग्रामसेवक, नगरपालिकेच्या बाबतीत मुख्य अधिकारी नगर परिषद यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी व महानगर पालिकेच्या बाबतीत आयुक्त यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांचे ९० दिवस काम केल्याबाबतचे प्रनाणपत्र अर्जासोबत दिल्यास त्यांची नोंदणी करणे सुलभ होईल त्या दृष्टीकोनातुन नियम ३३ मध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती प्रस्तावित करण्यात येत आहे.

Maharashtra Building and Other Construction Workers (R.E.&C.S.) Rules 2007

Rule 33 Registration of Beneficiary ( Proposed Amendment)

**33 (1)** :-Form Prescribed in format V to be amended as enclosed, to capture the information about Family details,. Bank A/c etc.

**33 (3)** The application for registration as beneficiary shall be accompanied with the following

**(a)** a fees as fixed by the Board

**(b)** Proof of age

**(c) Certificate from the employer, However, in case of Building and Other Construction Workers, whose work is of intermittent/temporary/casual nature and where the employers are multiple, the certificate issued by the Gram Sevak of the concerned Gram Panchayat/person authorised by the Chief Officer of the concerned Municipal Council/person authorised by**

**the Municipal Commissioner of the concerned Municipal Corporation.**

(d) 3 copies of the Passport Size Phtograph

**(e) Valid Address Proof**

**(f) Valid Photo ID Proof**

**33 (4)** The Secretary of the Board/**Authorised District Officer** shall Maintain register of beneficiaries in Form VI

उप सचिव, विधी व न्याय विभाग यांनी नियम ३३ मध्ये वरील प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली सुधारणा योग्य असल्याचे मत व्यक्त केले. या सुधारणेबाबत सविस्तर चर्चा होऊन नियम ३३ मध्ये वरीलप्रमाणे प्रस्तावित सुधारणा नियमामध्ये करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

तसेच मा.अध्यक्ष यांनी असे सुचविले की; कामगार संघटनेला अधिकार देण्याबाबत यापुर्वी आपण ठराव केला होता. तथापि त्यास विधी व न्याय विभागाची मान्यता मिळू शकलेली नाही त्यामुळे कामगार संघटनांना यामध्ये समाविष्ट करता येणार नाही. तथापि, संबंधित संघटनेने अशा कामगारांची यादी संबंधित सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांच्याकडे सादर करावी व अशा कामगारांना संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडून (जसे की,ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक/नगरपालिकेने प्राधिकरणाने प्राधिकृत केलेले व्यक्ती/महानगरपालिकेच्याबाबतीत आयुक्त यांनी प्राधिकृत केलेले व्यक्ती) प्रमाणपत्र मिळण्यासाठी सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी यांनी स्वत: पुढाकार घेऊन प्रमाणपत्र मिळवावे असे ठरले.

**मुददा क्र.:- (४) महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) नियम, २००७ मधील नियम क्र.४२ मध्ये गणपुर्तीबाबत प्रस्तावित दुरुस्तीबाबत**

कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर मालक व कामगारांचे प्रतिनिधींची मुदत ३० एप्रिल,२०१४ रोजी संपलेली आहे आणि शासनाने अद्याप नवीन सदस्यांची नियुक्ती केलेली नाही. त्यामुळे या मंडळाचे

कामकाज करता येत नाही. मंडळाचे कामकाज नियमितपणे चालू रहाण्याच्या दृष्टीकोनातुन नियम ४२ मधील गणपुर्तीबाबतच्या तरतुदीमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

Maharashtra Building and Other Construction Workers (R.E.&C.S.) Rules 2007

Rule 42 Quorum (Proposed Amendment)

**42 (1)** The quorum for the meeting shall be of the one third of the total members, having the preser e of at least one member each representing the Government, Employers and the building workers. **Provided that, for any reason, when no represesntatives of employers and / or building workers are nominated on board, Quorum shall be one third of the existing members.**

उप सचिव, विधी व न्याय विभाग यांनी नियम ४२ मध्ये वरीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली सुधारणा योग्य असल्याचे मत व्यक्त केले. या सुधारणेबाबत सविस्तर चर्चा होऊन नियम ४२ मध्ये वरीलप्रमाणे प्रस्तावित सुधारणा नियमामध्ये करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

मुददा क्र.:- **(५) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांसाठी काढण्यात आलेल्या जनता आरोग्य व वैयक्तीक अपघात विमा योजना रदद करुन यापुर्वी मंडळाने ठरविलेल्या आरोग्य व अपघातासंबंधीचे विविध लाभ देण्याबाबत.**

मा.मंत्री महोदय यांनी असे प्रतिपादन केले की, जनता आरोग्य व वैयक्तीक अपघात विमा योजनेमध्ये मंडळाने ३६ कोटीचा प्रिमियम भरला असून कामगारांना १ कोटी पेक्षाही कमी लाभ दिलेला आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ कामगारांना हव्या त्याप्रमाणात होत नसून कामगारांऐवजी विमा कंपनीचा फायदा होत आहे. त्याऐवजी नोंदित बांधकाम कामगारास मंडळाने यापुर्वी ठरावाद्वारे मंजूर केलेल्या सर्व आरोग्य व अपघातबाबतच्या योजनांचा लाभ देण्यात यावा. यावर श्री.भरमा कांबळे, सदस्य यांनी सांगितले की, अपघात विमा योजनेचा कोल्हापुर मध्ये

अनुभव चांगला आहे. त्यामुळे ही योजना इन्शुरन्स कंपनी ऐवजी मंडळामार्फत राबवावी असे प्रतिपादन केले. यावर मंडळाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे ही योजना मंडळामार्फत राबविता येणार नाही असे मा.मध्यक्षांनी सांगीतले. श्री.मुस्ताक अ.दळवी, सदस्य यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळामार्फत गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी असलेल्या रु.२५,०००/- च्या योजनेत आजाराचे स्वरुप पाहून वाढ करावी. यावर मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी सदर रक्कम रु.७५०००/- करण्यात यावी असे सुचित केले. यावर मा.मंत्री महोदयांनी सहमती दर्शविली. याबाबत सविस्तर चर्चा होऊन जनता आरोग्य विमा योजना रद्द करण्यात येऊन गंभीर स्वरुपाच्या आजारासाठी रु.७५०००/- वाढ करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**मुददा क्र.:- (६) महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरावरील कार्यालय प्रमुखास अधिकार प्रदान करणे (Delegation of Power)**

मा.कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, सध्या प्रत्येक जिल्हयातुन कामगारांचे अर्ज मुंबई येथे मंडळाकडे येतात आणि त्यामुळे नोंदीत कामगारांना योजनांचा लाभ मिळण्यासाठी विलंब होत आहे. ज्याप्रमाणे नैसर्गीक आपत्तीमध्ये मदत वाटप करण्याचे अधिकार तहसिलदार यांना प्रदान करण्यात आलेले आहेत त्याचधर्तीवर मंडळाच्या योजनांचे अर्ज स्विकारुन त्यास मंडळाच्या धोरणानुसार मंजूरी देण्याचे पुर्ण अधिकार जिल्हास्तरावरील कार्यालय प्रमुखास (उदा. अपर कामगार आयुक्त/सहाय्यक कामगार आयुक्त/सरकारी कामगार अधिकारी) यांना प्रदान केल्यास नोंदीत कामगारांस मंडळाच्या योजनांचा लाभ तातडीने मिळू शकतील. याबाबत मा.कामगार आयुक्त यांनी असे सांगीतले की, नोंदित बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तु वाटप आपण सर्व जिल्हयांच्या कार्यालय प्रमुखांमार्फत करीत आहोत त्याचधर्तीवर हे कामही चांगल्या पध्दतीने होऊ शकेल. याबाबत सर्वानुमते चर्चा होऊन सर्व जिल्हास्तरावरील कार्यालय प्रमुखांना अशाप्रकारचे अधिकार प्रदान करण्यात यावे असे ठरले. तसेच मा.प्रधान सचिव (कामगार) यांनी असे नमुद केले की, जिल्हास्तरावर अधिकार प्रदान केल्यानंतर कामात अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

तसेच कामगार आयुक्त यांनी असे प्रतिपादन केले की, मंडळाच्या योजनांचा कामगारांना लाभ होण्याच्या दृष्टीकोनातुन कामगारांची मंडळाकडे नोंदणी असणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे. सध्याचे उपलब्ध मनुष्यबळ विचारात घेता नोंदणीचे काम आऊटसोर्सिंगद्वारे यंत्रणा निश्चित करुन करणे योग्य राहील. तसेच या दृष्टीकोनोतुन नोंदणीचे काम चांगल्याप्रकारे सॉफ्टवेअर तयार करुन हार्डवेअर व मनष्युबळ पुरवठा करणा-या आऊटसोर्सिग यंत्रणेद्वारे करुन Activity bassed payment ठेवल्यास कामगारांची नोंदणी मोठया प्रमाणात होऊ शकेल. या बाबत सखोल चर्चेअंती नोंदणीचे काम आऊटसोर्सिगद्वारे करण्यात यावे असे ठरले.

**मुददा क्र.:- (७) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामध्ये बांधकाम कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी मंडळाद्वारे करावयाच्या प्रभावी जाहिरातीबाबत.**

मा.अध्यक्ष यांनी सांगीतले की, कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी मंडळाच्या कल्याणकारी योजनांची माहिती प्रभावी जाहीरातीद्वारे कामगारांना होण्याची आवश्यकता आहे. त्यानुसार व्यापक प्रमाणात एस.टी.बसेस, बेस्ट बसेस, मोबाईल व्हॅन इत्यादी मध्यमाद्वारे प्रभावी जाहीरात करण्यात यावी. तसेच कामगारांना रु.३०००/- अर्थसहाय वाटप करण्यात येणार आहे. या कामाचीही वर्तमानपत्राद्वारे महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांत प्रभावी प्रसिध्दी करण्यात यावी असे मा.अध्यक्षांनी सांगीतले. यावर सखोल चर्चेअंती कामगारांची नोंदणी वाढविण्यासाठी सुमारे २५ ते ३० कोटी निधी खर्च करुन मंडळाच्या योजनांची प्रभावी जाहीरात करावी असे सर्वानुमते ठरले..

**मुददा क्र.:- (८) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या अधिका-यांनी केरळ इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळास भेट दिल्याबाबत**

श्री.काकतकर, कामगार उप आयुक्त व श्रीमती भोसले, सहाय्यक कामगार आयुक्त यांनी केरळ राज्यातील इमारत बांधकाम कामगार मंडळाला भेट दिली व त्याबाबतची माहिती सदस्यांना दिली. केरळ राज्यात सुमारे १५ लाख बांधकाम कामगारांची नोंदणी झाली असून, मंडळामध्ये केवळ स्थानिक बांधकाम कामगारच नोंदीत केले जात असून. इतर राज्यातील बांधकाम कामगारांसाठी Interstate Migrant Scheme आहे. त्याचप्रमाणे मंडळाच्या मुख्यालयाची स्वतंत्र ४ मजली इमारत असून राज्याच्या प्रत्येक जिल्हयांत देखील स्वतंत्र कार्यालये आहेत. केरळच्या

धर्तीवर महाराष्ट्रामध्ये सुध्दा प्रत्येक जिल्हास्तरावर कार्यालय निर्माण करणे, अधिकारी व कर्मचारी पुरवठा करणे आवश्यक आहे त्यानुसार प्रस्ताव शासनास पाठवावा असे ठरले.

**मुददा क्र.:- (९) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांबाबत**

मंडळाचे सर्व अर्ज सुटसुटीत असतील व त्यात कोणत्याही प्रकारच्या जाचक अटी रहाणार नाही असे कामगार आयुक्त यांनी सांगीतले. तसेच मा.अध्यक्ष यांनी सांगीतले की, मंडळाच्या कल्याणकारी योजना सुटसुटीत असाव्यात आणि प्रत्येक योजनाच्या पात्रतेचे निकष दर्शविणारी माहिती पुस्तीका तयार करुन सर्व जिल्हयांना पाठवावी, त्यामुळे योजनांची प्रभावी अंमलबजावणी जिल्हापातळीवरुन होऊ शकेल. या बाबत सखोल चर्चेअंती मंडळाचे अर्जामध्ये सुधारणा करावी आणि योजनाच्या पात्रते बाबतचे निकष दर्शविणारी पुस्तीका तयार करण्यात यावी असे ठरले. तसेच मा.अध्यक्ष यांनी असे सांगीतले की, बांधकाम कामगारांच्या पाल्यांना तांत्रीक शिक्षण घेण्याच्या दृष्टीकोनातुन इंजिनियरींग, डिग्री व डिप्लोमा मध्ये शिकत असलेल्या बांधकाम कामगारांच्या पाल्यांना भरीव अर्थसहाय देणे आवश्यक आहे. या बाबत सखोल चर्चा होऊन बांधकाम कामगारांचा पाल्य इंजिनियरींग किंवा वैद्यकिय पदवीचे शिक्षण घेत असल्यास त्यास रु.५०,०००/- अर्थसहाय व इंजिनियरीग किंवा वैद्यकिय डिप्लोमाचे शिक्षण घेत असल्यास रु.३५,०००/- अर्थसहाय देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**मुददा क्र.:- (१०) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळावर लेखा अधिकारी तसेच हिशोब तपासणीस नियुक्त करणे**

कामगार आयुक्त यांनी असे सांगीतले की, मडळाकडे येणारा निधी विचारात घेता मंडळावर लेखा अधिकारी तसेच हिशोब तपासणीस (Internal Auditor) असणे आवश्यक आहे. मा.अध्यक्ष यांनी सांगीतले की, निविदा काढून हिशोबासाठी C.A. firm ची नियुक्ती करावी तसेच वित्त विभागाकडून लेखा अधिका-यांची नियुक्ती करावी किंवा सेवानिवृत्त अधिका-यांमधुन नियुक्ती करावी असे सर्वानुमते ठरले.

बैठकीचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न बघता तज्ञ समितीच्या निर्णयांची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त करण्यात आली.

कामगार आयुक्त तथा अध्यक्ष,
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,
मुंबई

सदस्य सचिव,
इमारत व इतर बांधकाम कामगार
(रोजगाराचे नियम सेवाशर्ती) अधिनियम,
१९९६ अंतर्गत तज्ञ समिती

मा.मंत्री (कामगार)
इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगाराचे
नियम सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत तज्ञ समिती